# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/ A 88967 दिनांक : 16/03/2021

## परिपत्रक

**विषय : महामंडळाच्या "क" , "ड" आणि "ड+" विभागातील औद्योगिक क्षेत्रामध्ये उद्योगांना भूखंड वाटपात प्राधान्य देणेबाबत..**

**संदर्भ :- १ .मऔविम/भूविभाग/म.व्य(भूमी)/ई-३६७८८ दि. ३१.१२.२०१८**

महामंडळाच्या विदर्भ, मराठवाडा, कोकण विभाग (केवळ रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हे), उत्तर महाराष्ट्र (नाशिक महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणचे क्षेत्र(NMRDA) वगळून) विभागातील "ड" आणि "ड +"औद्योगिक क्षेत्रांतील ज्या उद्योजकांच्या प्रकल्पामधील एकुण गुंतवणूक किमान रु. २० कोटी आहे व ज्या शेतकरी उत्पादक कंपनीची गुंतवणूक किमान रु. १० कोटी आहे अशा उद्योजकांना महामंडळाच्या दिनांक ३१.१२.२०१८ च्या परिपत्रकानुसार प्राधान्याने भूखंड वाटप करण्याचे धोरण निर्गमित केलेले आहे. दिनांक ३१.१२.२०१८ च्या परिपत्रकानुसार भूखंडाच्या क्षेत्राबाबत तरतूद नसल्याने उद्योजक २० कोटी रु. गुंतवणूक दाखवून छोटया आकाराचे भूखंड प्राधान्य सदराखाली वाटप करुन घेतात परंतु छोटया आकाराच्या भूखंडावर "ड"आणि "ड +" औद्योगिक क्षेत्रामध्ये २० कोटी गुंतवणूक होत नसल्याचे निदर्शनास येत असल्याने प्रकरणी दिनांक ३१.१२.२०१८ च्या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या दिनांक ०४.०२.२०२१ रोजी झालेल्या ३८८ व्या बैठकीत सादर करण्यात येवून ठराव क्र. ६१८६ पारीत करण्यात आला. सदरहू ठरावाच्या अनुषंगाने, महामंडळाने निर्गमित केलेले परिपत्रक क्र. ई-३६७८८ दिनांक ३१.१२.२०१८ चे परिपत्रकात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

१. २० कोटी गुंतवणूक करणा-या उद्योजकांची कमीतकमी ५००० चौ.मी. क्षेत्राची मागणी असेल अशा अर्जदारांना प्राधान्याने भूखंड वाटप करण्याकरीता विचार व्हावा. तसेच एखाद्या विशेष प्रकल्पाची मागणी ५००० चौ.मी. पेक्षा कमी तथापि किमान ४००० चौ.मी. असेल तर त्या प्रकल्पामधील गुंतवणूक, रोजगार निर्मिती इत्यादि बाबींचा विचार करुन मुकाअ यांच्या पूर्वपरवानगीने अशी प्रकरणे भूखंड वाटप समितीसमोर ठेवण्यात यावीत.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in

२. उद्योजकांच्या गुंतवणूकीबाबत सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३. संबंधित उप अभियंता/कार्यकारी अभियंता इमारत पूर्णत्वाचा दाखला देण्यापूर्वी अशा उद्योजकाने प्रकल्प अहवालानुसार गुंतवणूक केली असेल तरच इमारत पूर्णत्वाचा दाखला द्यावा.

४. उद्योजकाने जर त्याच्या प्रकल्प अहवालानुसार गुंतवणूक केली नाही तर अशा प्रकरणी त्या औद्योगिक क्षेत्रातील प्राप्त झालेल्या उच्चत्तम निविदेचा दर लावून त्यांच्याकडून फरकाची रक्कम वसूल करण्यात यावी.

५. जर निविदेव्दारे दर प्राप्त झाला नसेल तर प्रचलित दराच्या २५ टक्के अतिरिक्त रक्कम आकारण्यात यावी.

६. परिपत्रकातील १(अ) व १(ब) मध्ये उत्तर महाराष्ट्र(नाशिक महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाचे क्षेत्र(NMRDA) वगळून) च्या ऐवजी उत्तर महाराष्ट्र( नाशिक महानगरपालिका क्षेत्र वगळून) असा बदल करण्यात येत आहे.

सदरहू धोरण या परिपत्रकाचे दिनांकापासून लागू राहिल. सर्व संबंधितांनी सदर सुधारित धोरणाची नोंद घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई



midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in